आर.सी.सी.क्र.१११/२०२०
शासन / उमर.
**निशाणी क्र.२०.**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**
**मी शपथेवर निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | :– | तुळशीदास लक्ष्मण नागरगोजे. |
| वय सुमारे | :– | ३२ वर्ष. |
| व्यवसाय | :– | व्यवसाय. |
| राहण्याचे ठिकाण | :– | जयवंत नगर भूम, ता.भूम, जि. धाराशिव. |

**सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. यु. बी. दोलतोडे –**

दिनांक २२.०७.२०१९ रोजी मला गावातील लोकांनी भूम पोलिस स्टेशनमध्ये केस झाली आहे चला म्हणाले म्हणुन मी आलो. मी तेथे सकाळी अकरा ते बारा वा. सुमारास गेलो होतो. त्यावेळी माझ्यासोबत रामभाऊ विश्वनाथ नागरगोजे होते. पोलिसांनी मला सही करायला सांगितले होते. कशावर सही घेतली होती ते मला माहिती नाही. आता मला दिनांक २२.०७.२०१९ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अनु.क्र.२ वर सही असुन त्यातील मजकुर माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नाही. सबब अभियोग पक्षाने त्यास फितूर घोषीत करुन उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यांत आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२.०७.२०१९ रोजी पोलिसांनी मला भूम पोलिस स्टेशन येथे पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. त्यावेळी पोलिस स्टेशनमध्ये आरोपी होता किंवा कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी माझ्यासमक्ष पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातुन सुपर मॅक्स कंपनीचा अर्ध्या कापलेला ब्लेड जप्त करुन तसा जप्ती पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी जप्ती पंचनामा करुन मला वाचुन दाखविला व मी त्यावर वाचुन सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मुद्देमाल माझ्यासमक्ष जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व मी एकाच गावात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात आरोपीसोबत आलो असुन त्याच्या सांगण्यावरुन त्याला वाचविण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. व्ही. नागरगोजे यांच्यामार्फत–</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस स्टेशनमध्ये असताना पोलिसांनी माझ्या कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या होत्या.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

स्वाक्षरीत/–
**(श्रीमती ए. बी. जोंधळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, भूम.

दिनांक: १०.०४.२०२६